# पालकमंत्री अजित दादा देशाच्या राजकारणात असलेल्या पवार घराण्याची इज्जत विशीला टांगु नका गुन्हेगारांना आळा घालण्याचे बघा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे कुटुंब उघड्यावर?

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २५० ■ गुरूवार दि.२९ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 250 ■ Thursday Dt.29 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शब्दांचे पक्के असणाऱ्या अजित दादांकडूनच बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष?

## धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी उपमुख्यमंत्री अजित पवारांची वर्णी लागली; त्यानंतरही जिल्ह्यात गुन्हेगारीत मोठी वाढ झाली?

- ■ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री गुन्हेगारी रोखण्यासाठी अपयशी ठरले, ठिकठिकाणी गुन्हेगार वाढले?
- ■ अजितदादा आपण पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यात शंभर शेतकऱ्यांच्या आत्महत्या?
- ■ बीडमध्ये विमानतळ उभारु इच्छिणाऱ्या अजित दादांचे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांकडे साफ दुर्लक्ष?

बीड । प्रतिनिधी
ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख असणार्या बीड जिल्ह्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सारखा पालकमंत्री मिळाला आहे. असे असले तरी बीड जिल्ह्याची आवस्था तशीच आहे. पालकमंत्री होऊन अजित पवारांना जवळपास सहा महिने लोटले. या कालावधीत बीड जिल्ह्यातील तब्बल शंभर शेतकर्यांनी गळफस घेऊन जीवन संपवले. कर्ता पुरुष गेल्याने बीड जिल्ह्यातील शंभर कूटूंब उघड्यावर पडले आहेत.
बीड जिल्ह्यात शेतीत काही पिकत नाही, हाताला काम नाही. साडेसहा लाख मजूर दरवर्षी बीड जिल्ह्यातून संपुर्ण राज्यात ऊसतोडीसाठी जातात. ना कोणते उद्योग ना कोणते धंदे, एकीकडे आर्थिक परिस्थिती हालाखीची होत असतांना बीड जिल्ह्यात गुन्हेगारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येनंतर बीड जिल्ह्याचे वातावरण ढवळून निघाले आणि धनंजय मुंडेंना राजीनामा द्यावा लागला. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी उपमुख्यमंत्री अजित पवारांची वर्णी लागली. त्यानंतरही बीड जिल्ह्यात गुन्हेगारीत मोठी वाढ झाली. शेतकर्यांकडेही अजित दादांचे साफ दुर्लक्ष राहिले. सहा महिन्यातच बीड जिल्ह्यातील तब्बल शंभर शेतकर्यांनी आर्थिक आडचणीमुळे आणि नापिकीमुळे गळफास घेऊन आत्महत्या केली.
बीड मध्ये विमानतळ उभारु इच्छिणाऱ्या अजित दादांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांकडे साफ दुर्लक्ष केले. पालकमंत्री बदलला तरी बीड जिल्ह्याच्या नशिबी मात्र दुरावस्था कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून झालेल्या धुंवांधार पावसाने कांदा, फळबागा उद्ध्वस्थ झाल्या. कांद्याच्या पिकात चिखल झाला. हजारो शेतकऱ्यांची शेती वाहून गेली. आत्महत्यांचा आकडा पुन्हा वाढतो की काय अशी भिती आता व्यक्त होऊ लागली आहे.
सततची नापिक, वाढता लागवड खर्च, शेतीमालाला कवडीमोल भाव, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जबाजारीपणा या कारणांमुळे सहा महिन्यांमध्ये शंभर शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. आत्महत्या केलेल्यांच्या कुटूंबीयांना अद्यापही मदत मिळालेली नाही. पालकमंत्री अजित पवार आणि सरकार अपयशी ठरले आहेत.





## बिंदुसरेच रुपडं पालटतय : तहसीलदार शेळके

बीड । प्रतिनिधी
बीड शहर बिंदुसरा नदीच्या काठी वसलेले आहे, असे आपण अभिमानाने म्हणतो. परंतु या बिंदुसरेत जाऊन कधी पाहिले आहे का? जागोजागी वाढलेली झूडपे, गाळ, कचरा याचे साम्राज्य सर्वत्र दिसून येते. बीडचे नवीन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नेमकी हीच बाब हेरून बिंदुसरा नदीच्या सौंदर्यीकरणाची संकल्पना पुढे आणली. दिनांक २० मे रोजी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आमदार सय्यद सलीम, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक कविता जाधव, मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बिंदुसरा नदीच्या स्वच्छतेची मोहीम सुरू केली.
सोमेश्वर मंदिर ते खासबाग मंदिर, दगडी पुल ते यशवंत उद्यान, यशवंत उद्यान ते नवा मोंढा पूल, नवा मोंढा पूल ते श्रीकृष्ण मंदिर या भागातून मुख्यत: बिंदूसरा नदीचे पात्र शहरात आहे. या नदीची स्वच्छता, प्रवाह मोकळा करण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे. बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या स्वच्छतेसाठी २५ लाखाचा आमदार फंड निधी देण्याचे कबूल केले आहे. खोलीकरणाच्या व सौंदर्यीकरण्याच्या या कामासाठी जलसंपदा विभाग व नाम फाउंडेशनतर्फे आठ पोकलेन, आठ जीसीबी व दहा टिप्पर इतकी मशनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे.
बुधवार दिनांक २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी यशवंत उद्यान जवळ या कामाची पाहणी केली. या वेळी उपमुख्याधिकारी सम्राट कदम, स्वच्छता विभागाचे विश्वंभर कदम, मंडळ अधिकारी अनिल तांदळे, तलाठी शरद घोडके, तलाठी जगन्नाथ राऊत व कर्मचारी



पान २ वर



## गर्भवती हरिणीवर कुत्र्यांचा हल्ला; हरिणीला वाचविण्याचे प्रयत्न निष्फळ

लिंबागणेश । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकरी प्रजित प्रताप भोंडवे यांच्या शेतातील घरामागे सकाळी ७ वाजता कुत्र्यांच्या भुंकण्याचा गोंगाट ऐकु आला. प्रताप व प्रजित बापलेकांनी धाव घेतली असता त्याठिकाणी हरणांवर कुत्र्यांचा कळप हल्ला चढवताना दिसला. त्यांनी कुत्र्यांच्या तावडीतून हरणाची सुटका करत तिला पाणी पाजले आणि डॉ.गणेश ढवळे यांच्या घरी बैलगाडीत टाकुन आणले. डॉ.गणेश ढवळे यांनी लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांना बोलावून घेतले. वनविभागाचे कर्मचारी यांना फोनवरून कल्पना दिली.
डॉ.अर्जुन पवार, परिचर सुधाकर देशमुख यांनी गर्भवती हरणीवर उपचार करून वाचवण्याचे प्रयत्न केले परंतु कुत्र्यांनी हरणीच्या

पान २ वर

## निर्दयपणे कोंबून चाललेल्या ६० म्हशींची सुटका; तीन आयशर टेम्पो ताब्यात

### ४४ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी
तीन आयशर टेम्पोमधून ६० म्हशींना निर्दयपणे कोंबून घेऊन जात असताना तीन तरुणांनी या टेम्पोला अडवले. यानंतर पोलिसांच्या मदतीने या म्हशींची सुटका करण्यात आली. सदरील कारवाईत तब्बल ४४ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून सुटका करण्यात आलेल्या सर्व म्हशींना गोशाळेत दाखल करण्यात आले आहे. हि कारवाई मंगळवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास गेवराई तालुक्यातील गढीच्या उड्डाणपूल येथे करण्यात आली.
माजलगाव कडुन तीन आयशर टेम्पो क्र. चक-०३ ऊन ७७३०, चक-२३ -ण ६२८४, चक-१७ उत १०९० मधून विनापरवाना अवैधरित्या जनावरे भरुन ते विक्री करणेकरीता छत्रपती संभाजीनगर येथे घेवुन जात आहेत, अशी खात्रीशीर माहिती गेवराई येथील शुभम म्हेत्रे, वरुण नगरकर, राहुल शेलार यांना मिळाली. त्यानुसार सदरील टेम्पो गढी उड्डाणपूल येथील भगवान बाबा चौकामध्ये थांबवून त्यांनी पाहणी केली असता प्रत्येकी टेम्पोमध्ये २० अशा एकुण ६० म्हशी दिसून आल्या. यानंतर याची माहिती गेवराई पोलीसांना दिली असता सपोनि कोटकर, पोउपनि भुतेकर, पोउपनि खोत, पोउपनि पारधी हे गढी याठिकाणी आले. यावेळी त्यांनी पाहणी केली असता टेम्पोत निर्दयपणे कोबलेल्या म्हशींना कुठल्याही स्वरुपाचा चारा, पाणी ठेवला नसल्याचे तसेच त्यांच्या काळजीची व्यवस्था न करता अवैधरित्या कोंबुन ठेवल्याचे दिसुन आले. त्याचबरोबर जनावरांचे वैद्यकीय तपासणीचे प्रमाणपत्र, वाहतुक परवाना,



पान २ वर

# शिवसेनेच्या माध्यमातून नेहमी जनतेच्या हिताची कामे करु : सचिन मुळूक

## स्वराज्य नगरमधील ३० लक्ष रुपयांच्या रस्ता कामाचा मुळूक यांच्या हस्ते शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना मतांचे राजकारण नाही तर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करण्याची शिकवण दिली आहे आणि आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून नेहमीच जनतेच्या हिताचे काम करण्यास आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देत आहोत. याचाच एक भाग म्हणून आज स्वराज्यनगर भागातील वीस वर्षांचा प्रलंबित रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत असल्याने मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.



बीड शहरातील प्रभाग क्रमांक २२ स्वराज्य नगरमध्ये गेल्या २० वर्षापासून रस्ता व नालीचा गंभीर प्रश्न होता. कामाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. स्वराज्य नगर मधील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास होता. गेल्या वीस वर्षापासून स्वराज्यनगर वासियांचा रस्ते व नाल्यांची मागणी होती. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी पाठपुरावा केल्याने ३० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला. मुळूक यांच्या माध्यमातून स्वराज्य नगरमधील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाला सुरुवात झाली आहे. यामुळे नागरिकांना नक्कीच दिलासा मिळणार आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, गेल्या वीस वर्षापासून या भागातील नागरिकांना झालेला त्रास विचारात घेऊन दीर्घकाळ टिकेल अशा प्रकारचा रस्ता करण्याचे काम आता हाती घेण्यात आले आहे. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणारी अडचण दूर होईल. याशिवाय, या भागाचे स्वरूप बदलून ते अधिक सुंदर आणि स्वच्छ होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून बीड शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन शहरात विविध ठिकाणी विकासाची कामे करु असे मुळूक म्हणाले. यावेळी रवि शिंदे, विकास निकम, आबासाहेब लांडे, संभाजी धोंडगे, बाळासाहेब पिंगळे, शरद पवार, योगेश नाईक, जगदाळे काकू, नेहरकर काकू, मेढकर काकू, पवार काकू, वडचकर काकू, पांचाळ काकू सह परिसरातील सर्व नागरिक उपस्थित होते.

# पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे अरेबियन ज्वेलर्स बीडकरांना गंडवून फरार : प्रा.उबाळे

## सहा महिन्यांपूर्वीच पोलिसांना निवेदनाद्वारे दिली होती माहिती

बीड । प्रतिनिधी




शहरातील मल्टिस्टेट, पतसंस्थांचे प्रकरण गाजत असतानाच अरेबियन ज्वेलर्सच्या नावाखाली मोठे अमिष दाखवून नागरिकांची लूट होत असल्याचा प्रकार बीडमध्ये अनेक महिन्यांपासून सुरू होता. या प्रकरणी २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड शहर पोलिस ठाणे व पोलिस अधीक्षकांना निवेदनही दिले होते. मात्र पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. आज अरेबियन ज्वेलर्स चालक बीडमधून फरार झाल्याचे उघड झाले असून केवळ पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडला आहे असा आरोप स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा,सचिन उबाळे यांनी केला आहे. अरेबियन ज्वेलर्सकडून शहरातील नागरिकांना गंडविले जात असताना या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी उबाळे यांनी केली होती. मात्र पोलिसांनी या प्रकाराकडे साफ दुर्लक्ष केल्याचे उबाळे यांनी म्हटले आहे. बीड शहरातील कारंजा रोड भागात अरेबियन ज्वेलर्सच्या माध्यमातून अवैध लॉटरी कुपन विक्री करुन नागरिकांना गाड्या, सोने देण्याचे आश्वासन देत आर्थिक लूट केली जात होती. पोलिसांच्या डोळ्यात धुळफेक करत हा प्रकार वर्षभरापासून सुरू होता. अरेबियन ज्वेलर्सचे महेबुब रहेमान मलिक हे खोटे अमिष दाखवून नागरिकांना विविध योजनेत पैसे गुंतवण्यास प्रवृत्त करत होते. या प्रकरणी स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन उबाळे यांनी आवाज उठवत नागरिकांना अरेबियन ज्वेलर्सपासून सावध राहण्याचे आवाहन केले. एवढेच नाही तर २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या सर्व प्रकाराची माहिती दिली होती. मात्र पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. केवळ पोलिसाच्या हलगर्जीपणामुळे अरेबियन ज्वेलर्स चालक बीडकरांना मोठ्या प्रमाणात गंडवून फरार झाला असल्याचा आरोप प्रा. सचिन उबाळे यांनी केला आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी २० हजार व हेक्टरी ५० हजारांचे अनुदान तातडीने द्या : ॲड. श्रीनिवास बेदरे

# खरिपासाठी शेतकऱ्यांना मोफत बियाणे व खते द्या!

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकरी संकटाचा सामना करत असतानाच मुसळधार पावसाने पुन्हा त्याला संकटात टाकले आहे. या पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेले पिकही वाहून गेले आहे. निसर्ग लहरी झाला असून राज्यातील फडणविसांचे सुलतानी सरकार शेतकरी व जनतेच्या मुळावर उठले आहे. संकटातील शेतकऱ्याला मदतीची गरज असून सरकारने पंचनाम्याचे सरकारी सोपस्कर बाजूला ठेवून नुकसानग्रस्तांना एकरी २० हजार रुपये मदत तातडीने द्यावी, अशी मागणी बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे केले आहे.

पुढे युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीनिवास बेदरे म्हणाले की, बळीराजा संकटात आल्यास त्याला तातडीने मदत करण्याचे काम काँग्रेसचे सरकार असताना अनेकदा केले आहे. पिकावर रोग पडला, लाल्या पडल्या, गारपीट झाली, अवकाळी पावसाने नुकसान झाले की सरकारने कशाचीही पर्वा न करता शेतकऱ्याला मदत दिली आहे. आताचे सरकार मात्र शेतकऱ्याला मदत करण्याच्या विचाराचे नाही. केवळ पंचनामे करण्याचे आदेश देऊन, कोरडी आश्वासने देऊन चालणार नाही, शेतक-यांना तातडीने मदत पोहचवली पाहिजे. खरिप हंगामाच्या सुरुवातीलाच मोठे संकट आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. कर्जमाफी अद्याप जाहीर केलेली नाही, कर्जाचे पुनर्गठन तरी करून द्यावे. सरकारचे खरिपाचे काहीच नियोजन नाही याकडेही लक्ष वेधून अडचणीत आलेल्या शेतक-यांना खरीप हंगामासाठी मोफत बियाणे व खते द्यावीत, असे युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.

# प्रभू विश्वकर्मा मंदिरात सुतार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

फेब्रुवारी/मार्च २०२५ माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ७५% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार दि.२६/५/२०२५ रोजी दुपारी १.०० वा. प्रभू विश्वकर्मा उत्सव समिती व समाजातील एक उद्योजक गंगाधर आगलावे (आण्णा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात दोन्ही वर्गातील अणूकृमे पहले बक्षीस २५००, दुसरे १५००, तीसरे १००० हे अण्णांनी आपले आई, वडील आणि मुलगा यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना दिले.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री पांडुरंग उनवने यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण आखाडे, श्रीमती गंगाखेडकर मॅडम (विस्तार अधिकारी), शांतीनाथ डोरले, अर्जून नन्नवरे, सुतार सर, झेंडेकर सर, बाळकृष्ण खारके, बाळासाहेब सुतार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री अरुण कुंडलकर (नाना) होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंढरीनाथ क्षिरसागर यांनी केले. शेवटी पाहूणंयाचे व उपस्थितांचे आभार राजू पांचाळ यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील बापुराव भालेकर, सुभाष खोगरे, प्रमोद पांचाळ, प्रकाश क्षिरसागर, मुक्तेश्वर सागुळे, सुधाकर वाघमारे, बाबुराव पांचाळ, संतोष भालेकर, दत्तात्रय मानकर यांनी परीश्रम केले. कार्यक्रमानंतर उद्योजक गंगाधर आगलावे यांनी सर्व समाजबांधवांना अन्न दान दिले. या वेळी जिल्ह्यातील सर्व विश्वकर्मिय समाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बीड पंचायत समितीचे चार तांत्रिक सहाय्यक तात्काळ कार्यमुक्त

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीमधील मग्राराहयो कक्षात रुजू झाल्यापासून वारंवार गैरहजर राहणे, बरिष्ठांनी वारंवार दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, घरकुल योजनेचे निर्गमित मस्टरची एम.बी. न करणे, वैयक्तीक कामांमध्ये चालढकल करणे, लाभार्थ्यांना वेठीस धरणे, नवीन कामे र चालू करणे, आढावा बैठकीला गैर हजर राहणे आदि चुकीचे व बोगस कामे करणार्या ए. बी. आमटे, एस. एन. गवते, श्रीमती के.एम. होगले, आणि व्ही.एच. अंधारे वा चार तांत्रिक सहाय्यकांविरुध्द सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी बीड पं.स.च्या मुख्य गटविकास अधिकार्यांकडे तक्रार दाखल केली होती. बाबर गटविकास अधिकार्यांनी तात्काळ कार्यवाही करत त्या चार तांत्रिक सहाय्यकांना कार्यमुक्त करत त्यांच्याकडील सर्व एम.बी. च इतर दस्तऐवज मग्रारोहयो कक्षात जमा करण्याचे आदेश काढते आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या वैयक्तीक व ग्राम पंचायतच्या सार्वजनिक कामात खोडा घालणार्या बार तांत्रिक सहाय्यकांना चांगलाच दणका बसला आहे. तसेच या चार तांत्रिक सहाय्यकांनी आतापर्यंत केलेल्या कामाची मुध्दा चौकशी होणार असल्याचे सरपंच उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी महटले आहे.

सरपंच, उपसरपंच संघटनेच्या माध्यमातून सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य यांच्या विविध प्रश्नी कायम आक्रमक भूमिका घेत त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले होते. त्या निवेदनात म्हटले होते की, मग्रारोहयो अंतर्गत कर्मचार्यांची बदली करुन त्यांनी केलेल्या बोगस रस्त्यांच्या कामाची सखोल चौकशी करावी अशी मागणी केली होती. बीड पं.स. अंतर्गत मग्रारोहयो विभागात कार्यरत असणारे तांत्रिक सहाय्यक (पीटीओ) श्रीमती के.एम. होगले, व्ही. एच. अंधारे, ए.व्ही. आमटे, एस.एन. गवते यांच्या बद्दल अनेक ग्राम पंचायतीमधून तसेच वैयक्तीक लाभार्थ्यांकडून तक्रारी अलेल्यि होता. संबंधित कर्मचारी हे सतत मोबाईल बंद ठेवतात, चुकीच्या मोजमाप पुस्तीका रेकॉर्ड करणे, सतत कार्यालयात गैरहजर राहणे, वारंवार लाभार्थ्यांना पैशाची मागणी करणे अशा प्रकारच्या तक्रारी असून त्यांनी केलेल्या कामाची सखोल चौकशी करून त्यांची बदली इतर तालुक्यात करण्यात यावी अशी मागणी श्री. खांडे केली होती.

कुंडलिक खांडे यांच्या तक्रारीवरुन बीड पं.स.चे गटविकास अधिकारी पी.एन.बानखडे यांनी तांत्रिक सहाय्यक (पीटीओ) श्रीमती के. एम. होगले, व्ही.एच. अंधारे, ए. व्ही. आमटे, एस. एन. गवते यांना मग्रारोहया कक्षात रुजू झाल्यापसून कसल्याही प्रकारची लेखी स्वरुपात अर्ज न देता चारंवार गैरहजर राहणे, घरकुलाचे निर्गमित झालेले मस्टरची एम.बी. करणे, वैयक्तीक गायगोठा, जलसिंचन विहिर, कामाचे एम.बी. रेकॉर्ड न करणे, तसेच मा. आयुक्त यांनी दिलेल्या सूचना सार्वजनिक नवीन कामे चालू न करणे, जे चुकीचे काम आहे त्या कामाची एम बी रेकार्ड करणे, आदेशित सर्कलमधील लाभार्थाचे फोन न घेणे, तसेच वेळोवेळी ग्राम पंचायत मधून वैयक्तीक व सार्वजनिक कामाचे मागणी येवून सुध्दा जी टॅकिंग वेळेवर न करणे, प्रा.पं. मधील ग्रामरोजगार सेवक बांची मजुरांचे अर्काऊंट नंबर, आधार नंबर इतर अडचणीसाठी कार्यालमा बारंवार येवून सुध्दा त्यांची भेट व दरख्वनी न उचलणे, मग्रारोहयोच्या प्रलंबित विषया बाबत पंचायत समिती सभागृहातील दि.१३ मे २०२५ रोजीच्या आढावा बैठकीस गैरहजर राहणे अशा अनेक बाकी निदर्शनास आल्या असून आपणास लेखी व तोंडी सूचना देवून सुध्दा आपल्या वर्तणुकीत कसल्याही प्रकारची सुधारणा झाल्याचे दिसत नाही असे श्री. बानखडे यांनी म्हटले आहे. तसेच बरील चारही तांत्रिक सहाय्यकांना कर्तव्याची जबाबदारी नसून त्यांना नोकरीची आवश्यकता दिसून येत नाही त्यामुळे यांना दि. २७ मे २०२५ पासून बीड मग्रारोहयो कक्षातून कार्यमुक्त करण्यात येत असल्याचे गटविकास अधिकारी पी.एन. वानखडे यांच्या आदेशात म्हटले आहे.

> कोणीही अडवणूक केल्यास तात्काळ संपर्क करा कुंडलिक खांडवीड पंचायत समिती मग्रारोहयो कक्षातून होणार्या परफुल, वैयक्तीक गावगोठा, जलसिंचन विहिर जादि कामांमध्ये सरपंच, ग्राम पंचायत किंवा वैयक्तीक लाभार्थ्यांची अडवणूक जर कोणी करत असेल तर सरपंच, उपसरपंच संघटनेकडे याची तक्रार फण्यात यावी. प्रशासनातील काही चुकीचे काम करणार्या लोकांच्या दबावाला बळी न पडला आपले प्रत्र संघटनेच्या माध्यमातून सोइयग्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. यासाठी आपल्या काही तक्रारी असल्यास सरपंच, उपसरपंच संघटनेचे कार्यालय तुळजाई चौक, नाट्यगृह रोड बीड पेधे लक्ष्मण खांडे (मो.नं. ९७५००११००१) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन सरपंच, उत्पंच, उपसरपंच उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केले आहे.

# चोंडी या ठिकाणी होणाऱ्या ऐतिहासिक जयंतीचे साक्षीदार व्हा : डॉ. सिद्धार्थ रहींज

बीड । प्रतिनिधी



राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे या दिवशी ३०० वी जयंती चौंडी या ठिकाणी मोठ्या उत्साहात जयंती साजरी होणार आहे. या चोंडी या ठिकाणी होणाऱ्या जयंती निमित्त उपस्थित राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी आमदार हे उपस्थित राहणार आहेत. या होणाऱ्या जयंतीनिमित्त राज्यातील समाज बांधवांनी खूप मोठ्या प्रमाणात या जयंतीनिमित्त उपस्थित राहावे असे आव्हान डॉ, सिद्धार्थ रहींज यांनी केले आहे.

पान १ वरून...

## बिंदुसरेच रुपडं पालटतय : तहसीलदार शेळके

उपस्थित होते. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हटले की बिंदुसरेच्या खोलीकरण व सौंदर्यीकरण करण्याच्या या कामी सामाजिक संघटना, दानशूर व्यक्ती यांनी सुद्धा आपला सहभाग नोंदवावा. आपल्या शहराची बिंदुसरा नदी ही शान आहे.

नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी सम्राट कदम यांनी नमूद केले की पावसाळ्यात पूररेषेच्या अंतर्गत राहणाऱ्या नागरिकांनी स्वतःच्या जीविताची व मालमत्तेची काळजी घ्यावी. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

## गर्भवती हरिणीवर कुत्र्यांचा हल्ला

मानेवर व ईतर ठिकाणी गंभीर चावे घेतल्यामुळे हरिणीने प्राण सोडले. वनविभागाचे कर्मचारी वनरक्षक महेश मेटे, वनकर्मचारी अनिल शेळके, गौतम वीर, हनुमंत वायभट, मधुकर वायभट वनविभागाची गाडी घेऊन लिंबागणेश येथे पोहोचले. हरिणीला त्यांच्या ताब्यात दिले. गर्भवती हरिणी असल्याने लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पोस्टमार्टेम करून हरीणीच्या गर्भातील पाडसाला वाचवण्याचा प्रयत्न डॉ.अर्जुन पवार व परीचर सुधाकर वैद्य यांनी केला परंतु दुर्दैवाने मृतावस्थेत आढळून आले. मृत हरणीचे शरीर वनविभाग कर्मचाऱ्यांच्या हवाली करण्यात आले. गर्भवती हरिणीला वाचविण्यात शेतकरी पुत्र प्रजित भोंडवे आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांचे निकराचे प्रयत्न निष्फळ ठरले.

## निर्दयपणे कोंबून चाललेल्या ६० म्हशींची

चारापाण्याच्या व्यवस्थेबाबत देखील कागदपत्रे दिसून आले नाही. त्यामुळे हि जनावरे टेम्पोसह ताब्यात घेऊन नंतर म्हशींना गोशाळेत दाखल करण्यात आले.

याप्रकरणी कासिम नसिर अन्सारी (वय ३८ वर्षे) रा.बुंलदशहर उत्तरप्रदेश, मोहम्मद मुजमिल मेहरबान कुरेशी (वय २२ वर्षे) रा. शिवाजीनगर वाशी मुंबई, सगीरखान शहबाज खान (वय ३१ वर्षे) रा. ईस्लामपुरा बीड व त्याचेसोबत असलेला क्लिनर शेख मुबारक मोहम्मद (वय २८ वर्षे) रा. बार्शीनाका बीड, रविकुमार हरिप्रसाद जोशी (वय ४५ वर्षे) रा. बुंलदशहर उत्तरप्रदेश व त्याच्यासोबत असलेला क्लिनर मोहम्मद अझहर बलीमोहम्मद (वय १९ वर्षे) रा. मेरठ राज्य उत्तरप्रदेश यांच्याविरोधात शुभम म्हेत्रे (गेवराई) यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

# भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे: किसन तांगडे

बीड । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.

भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, सतीश सिनगारे, भीमराव घोडेराव, राजाभाऊ वक्ते, राजाभाऊ कांबळे, देवानंद वाघमारे, भास्कर जावळे, भाऊसाहेब दळवी, भैय्या वाघमारे, रतन वाघमारे, रामेश्वर खळगे, नामदेव वाघमारे, नवनाथ डोळस, कैलास जोगदंड, विजय ओव्हाळ, प्रणव पायाळ, विशाल इंगोले, अजित सावंत, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, सिद्धार्थ वाघमारे, आकाश जावळे, विशाल पवार, राजेंद्र भालेराव, बबलू सोनवणे, मोहन खेमाडे, महादेव इनकर, विक्रम सोनवणे, तेजराज केंगार, दयानंद उबाळे, बाजीराव वाघमारे, अजय आठवले, अशोक दळवी, श्रीमंत जाधव, विकास वाघमारे, अमोल डावकर, लखन ठोकळ, संदेश मस्के आदींनी केले आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना महिनाभरात मदत मिळणार

## जिल्हाधिकारी महिन्यातुन दोन वेळा बैठका घेणार; पालकमंत्री अजितदादाकडून आंदोलनाची दखल : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकाचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपये मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने कुटुंबांची परवड होत होती. त्यामुळे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या हाती असणारे उपमुख्यमंत्री वित्त मंत्री तथा नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अजितदादांच्या विकासाचे गाजर वाटप आंदोलन करण्यात आले होते.

या अनुषंगाने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याची दखल घेत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना शासकीय मदत देण्याच्या हेडवर निधी उपलब्ध नसल्यास ईतर हेडमधुन तो निधी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्याचे निर्देश पालकमंत्री बीड यांनी जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन यांना दिल्याची माहिती काल दि.२८ बुधवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत दिली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन स्वत: शेतकरी आत्महत्येचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातुन दोन बैठका घेणार असुन तालुकास्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसांत जिल्हा समितीकडे पाठवावे असुन याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसात पूर्ण केली जाणार असल्याने महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी बैठकीत दिली.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील पात्र ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तातडीने निधी देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे व त्यांचे सहकारी शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे, शेख मुस्ताक, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अजितदादांचे विकासाचे गाजर वाटप लक्ष्यवेधी आंदोलन करत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदतनिधीची पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तरतूद करावी अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री बीड अजितदादा यांनी जिल्हाधिकारी बीड यांना आदेश दिले आहेत.



# सोमवती अमावस्या व शनि जयंतीच्या अद्वितीय संयोगाने भक्तांनी गाठले

## नाथांसह आदिनाथांचे तीर्थक्षेत्र मढी, मायंबा, वृद्धेश्वर येथे लाखोंच्या संख्येने भाविकांची गर्दी

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यात सोमवती अमावस्या आणि शनि जयंती या दोन पवित्र पर्वांचा दुर्मीळ संयोग यंदा साधल्यामुळे तालुक्यातील विविध तीर्थक्षेत्रांवर भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. मायंबा येथील मच्छिंद्रनाथ समाधी, प्राचीन शनि मंदिर (सावरगाव), मढी येथील कानिफनाथ मंदिर, वृद्धेश्वर येथील आदिनाथांचे मंदिर (पाथर्डी) येथे दर्शनासाठी लाखो भाविकांची रीघ लागली होती. सोमवारी सकाळपासून सुरू झालेला भाविकांचा ओघ मंगळवारी पहाटेपर्यंत अखंड सुरू होता. या दोन दिवसीय पर्वणीमध्ये भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले.



मंदिर परिसरात आणि गडाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, ज्यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीही निर्माण झाली. राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेले हजारो नाथ भक्त मायंबा व मढी येथे मुक्काम करून या पावन पर्वाचा लाभ घेत होते. मायंबा येथील मंदिर परिसरात बद्रीनाथ भगत (सावरगाव), सद्गुरु सेवा मंडळ (आष्टी) व नवनाथ भक्तिमंडळ (राहुरी) यांच्या वतीने भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भक्तांनी लाभ घेतला.

दरम्यान, मायंबा येथील मच्छिंद्रनाथ संजीवन समाधीच्या गाभाऱ्याचे बांधकाम लवकरच सुरू होणार असून, हे हेमाडपंथी शैलीतील भव्य दगडी मंदिर असणार आहे. या कामासाठी अंदाजे ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, पार्किंग व भक्तनिवासाची कामे सध्या सुरू आहेत. देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे यांनी या कामांसाठी भक्तांनी मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन केले आहे.



## ब्राह्मण सभेचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील ब्राह्मण सभेच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा गुरूवार २९ मे रोजी शहराच्या देशपांडे गल्लीतील देवघर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात १६ बटुचे उपनयन संस्कार करण्यात आले सातत्याने गेल्या ४८ वर्षापासून उपनयन संस्कार सोहळ्याचा उपक्रम आर्थिक दुर्बल घटकांसाठी सातत्याने राबविला जात असल्याने या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होते.

या सोहळ्यासाठी माजी आ. पृथ्वीराज साठे, कमलाकर चौसाळकर, गिरधारीलाल भराडिया, बबन लोमटे, मनोज लखेरा, प्रसाद चिक्षे, ॲड.मकरंद पत्की, महेश लोमटे, दिनकर जोशी, अतूल देशपांडे, गणेश पिंगळे, प्रशांत बर्दापुरकर, राहूल देशपांडे, अविनाश मुंडेगांवकर, दिलिप सांगळे, अनिरुद्ध चौसाळकर, प्रभाकर सेलमोकर, पद्माकर सेलमोकर, सागर दिक्षित, संजय लोणीकर, मुकूंद घाटे, आनंद गोस्वामी, सुधाकर विडेकर, ॲड.कल्याणी विर्धे, अनुपमा गोस्वामी, आदीसह ब्राम्हण सभेचे पदाधिकारी यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.गणेश पिंगळे यांनी केले. कार्यक्रमासाठी दादा महाराज दिक्षित व पुरोहित संघाचे पदाधिकारी आदींनी परीश्रम घेतले.

# डॉ. गिलबिले व डॉ.मस्के यांना वैद्यकीय क्षेत्रातील कर्मवीर ॲड. एकनाथ अवाड पुरस्कार प्रदान

माजलगाव । प्रतिनिधी





कर्मवीर ॲड. एकनाथ अवाड यांच्या स्मृती दिनानिमित्त दि.२५ मे या दिवशी मानवी हक्क अभियान च्या वतीने तेलगाव येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार वितरण करण्यात आले. यामध्ये विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यामध्ये माजलगांव येथील डॉ.गिलबीले व डॉ. मस्के यांना वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना पुरस्काराचे स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले असून यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आनंदगावकर उदघाटक मोहन जगताप मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष तथा जे एन यू दिल्ली चे प्रा डॉ मिलिंद आवाड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाशराव आनंदगावकर होते तर उद्घाटक म्हणून मोहनराव जगताप प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड उपस्थित होते. मंचावर दादासाहेब क्षीरसागर, दादासाहेब मुंडे, श्रीमती गयाबाई आवाड, सत्यभामा सौंदरमल, सरपंच दत्तात्रय डाके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, धम्मानंद साळवे, माजी सरपंच अशोकराव लगड, संतोष यादव, एकनाथ मस्के, बाळासाहेब ताकट, शरद यादव, मोहन जाधव, अशोक वाडेकर सर आदी उपस्थित होते. कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमात कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या नावाने समाजामध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्मृती चिन्ह देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी डॉ. प्रा. मिलिंद आवाड, दत्ता डाके अशोकराव लगड, ॲड. नारायण गोले, उमेश मोगरेकर, सत्यभामा सौदरमल, दादासाहेब मुंडे यांच्यासह मानवी हक अभियान विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष पदाधिकारी यांनी आपल्या भावना व्यक्त करत आवाडांना आदरांजली अर्पण केली या कार्यक्रमास महिला, पुरुष मोठ्या व समाजबांधव संख्येने उपस्थित होते.



## धारूर येथे भाजपकडून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील भारतीय जनता पार्टी कडून कैप्टन राजपालसिंह हजारी इंग्लिश येथे २८ मे बुधवार रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले होते. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगर अध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, ॲड. बालासाहेब चोले, दत्ता भाऊ धोत्रे, ॲड.मोहन भोसले, राधाकृष्णा चोले, रामधन वाव्हल, प्रभाकर गिराम, कृष्णा अंकुशे, प्रभाकर जाधव, उमेश शेटे, संदेश लांडगे सह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे : तांगडे

बीड । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्धस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि.३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.

भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, सतीश सिनगारे, भीमराव घोडेराव, राजाभाऊ वक्ते, राजाभाऊ कांबळे, देवानंद वाघमारे, भास्कर जावळे, भाऊसाहेब दळवी, भैय्या वाघमारे, रतन वाघमारे, रामेश्वर खळगे, नामदेव वाघमारे, नवनाथ डोळस, कैलास जोगदंड, विजय ओव्हाळ, प्रणव पायाळ, विशाल इंगोले, अजित सावंत, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, सिद्धार्थ वाघमारे, आकाश जावळे, विशाल पवार, राजेंद्र भालेराव, बबलू सोनवणे, मोहन खेमाडे, महादेव इनकर, विक्रम सोनवणे, तेजराज केंगार, दयानंद उबाळे, बाजीराव वाघमारे, अजय आठवले, अशोक दळवी, श्रीमंत जाधव, विकास वाघमारे, अमोल डावकर, लखन ठोकळ, संदेश मस्के आदींनी केले आहे.




श्रीकृष्ण एजन्सीज् च्या उद्घाटनप्रसंगी सुनील अनभुले यांना शुभेच्छा देताना लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, रज्जाक शेख, गणेश काळे इत्यादी. सुनील अनभुले यांनी नगर नाका, कॅनाल रोड बीड येथे पाण्याचे पंप व पाईप चे ठोक विक्री चे दुकान सुरू केले आहे. या प्रसंगी उपस्थित राहुन शुभेच्छा दिल्या.

## वाढदिवसाच्या निमित्ताने हलिमा शेख यांच्या कार्याचा आढावा

# समाज कार्य, लोकशाही टिकवणे हेच ध्येय : हलिमा शेख

पुणे । प्रतिनिधी

हलिमा शेख एक राजकीय, सामाजिक कार्याचे अष्टपैलू महत्व असलेली व्यक्तिमत्व त्यांच्याच शब्दात जाणून घेऊ. मी हलीम अल्लूहाबकश शेख महाराष्ट्रात २००४ ला पुणे येथे आले. आल्यावर काही दिवस नातेवाइकांना कडे राहिले, काही महिने शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे राहिले. कालांतराने मी माझ्या मुला बाळां सोबत पाटील इस्टेट मध्ये राहण्यास सुरुवात केली. लोकांची घरकामे करून मुलांचे पालन पोषण व शिक्षण करू लागली. पुढे जाऊन मी समाजसेवा करण्याचे धोरण मनात ठेवले. त्यावेळेस मी काही महिलांना सोबत घेऊन महिला बचत गटाची सुरुवात केली. माझी अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते सगळे एकत्रित येऊन आम्ही सामाजिक कार्यां ची सुरुवात केली. त्यावेळी मी अनेक राजकीय व सामाजिक संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून सामाजिक कार्य केले. मी माझ्या स्वत:च्या मेहनतीने व स्वत:ला खंबीरपणे मन घट्ट ठेऊन माझ्या संस्थेची स्थापना केली. २०१६/१७ मध्ये स्वयं प्रेरणा विकास संस्था म्हणून स्थापन. परिस्थिती हलाक्याची असल्यामुळे आर्थिक टंचाई येऊ लागली त्यामध्ये मला काँग्रेसचे मा.आमदार विनायक निमन यांनी खूप सहकार्य केले.

मी २००४ ते २०२५ पर्यंत मी अनेक सामाजिक- राजकीय पक्षासोबत पदाधिकारी म्हणून कार्य केले. शेवटी समाजाला न्याय मिळवून द्यायचा असेल तर त्यांच्या हक्कासाठी पत्रकारिता हेच एक पर्याय असल्याचे दिसून आले. म्हणून मी पत्रकारितेत लोकशाही पत्रकार संघांचे प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण खान यांच्या माध्यमातून सं.अ.बीबी वैद्य सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या साप्ताहिक /दैनिक युवती राज वृत्तपत्राची उपसंपादक म्हणून मला संधी दिली. तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष म्हणून ही मोठी जबाबदारी तर दिलीच त्याच सोबत महिला अन्याय अत्याचार निर्मूलन समिती च्या प्रदेश अध्यक्ष पदी निवड करून अयुब सर आणि वैद्य सर यांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याला तडा जाऊ देणार नाही. राज्यात जेथे कुठे महिलांवर अन्याय - अत्याचार होतील तिथे पाहिलं मी जाऊन त्या महिलांना न्याय मिळवून देणार. साप्ताहिक युवती राज च्या वर्तमान पत्रातून अनेक लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न मी करिन हे ही तितकेच खरं. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्यात च मोठं करणार नाही तर संपूर्ण भारतात संघ मोठा करिन असं ही नमूद करते.

येथून पुढचा माझा प्रवास फक्त आणि फक्त आता समाज सेवा आणि पत्रकारिता सोबत प्रत्येक तालुका आणि जिल्ह्यात सर्व सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पत्रकारांचा कट्टा हे चालू करून या मध्यमातून अनेकांचे प्रश्न सोडविणार आहे. प्रत्येक प्रश्नाचे निरासन करण्यासाठी पत्र व्यवहार, फोन, प्रत्येक्षात भेटून प्रश्न सोडविणार आहे. असे ही लोकशाही मध्ये हुकूम शाही चालवीणाऱ्या विरोधात आंदोलन, मोर्चा, उपोषण करिन पण सर्वसामान्यांना न्याय मिळवून देईल. हाच माझा ध्यास राहील. कारण मला आजपर्यंत माझ्या समाजाने, गोरगरीब जनतेने जे मला दिलं. ते मला परत देणं गरजेच आहे हा उद्देश समोर ठेवून मी समाजासाठी अहोरात्र प्रयत्न करीन.



# आ. सोळंके व मुख्याधिकारी चव्हाण यांच्या हलगर्जी लापरवाहीमुळे शहरवासीयामध्ये व्यक्त होतोय संताप व आक्रोश?




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषद अंतर्गत शहरवासीयांना देण्यात येणाऱ्या सुविधांचा अभाव गेली अनेक महिन्यापासून शहरामध्ये चालू आहे. नगर परिषदेचे मुख्य अधिकारी श्री. चव्हाण हे आल्यापासून ना कशाचा विकास, त्यांनी शहरच करून टाकले भकास! अशा दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांमुळे शहरवासीयांना नगरपरिषदेच्या सुख सुविधा पासून तर वंचितच राहावे लागत असून अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

माजलगाव नगर परिषदे अंतर्गत शहर वासियांना पंधरा पंधरा दिवसाला नळाला पाणी सोडले जाते आणि तेही पाणी विना फिल्टर गढुळ, घाण पाणी हे पाणी पिल्यामुळे दुर्धर आजार होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. करोडो रुपये खर्च करून नगर परिषदने शहरवासीयांसाठी पाणी फिल्टर योजना आणली परंतु माजलगाव नगरपरिषद नागरिकांना फिल्टर स्वच्छ पाणी देण्यास व पाजण्यास वसमत फिरत आहे. इतकच नाही तर, शहरामध्ये अस्वच्छतेमुळे घाणीचे साम्राज्य पसरली आहे. शहरातील नाल्या गटाराची सफाई न केल्यामुळे शहरात नाल्या तुंबल्या जात असल्यामुळे या नाल्याचे पाणी रोडवर साचत असल्यामुळे नागरिकांनी व्यापाऱ्यांना याचा खूप मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. नगरपरिषदेमार्फत सफाई टेंडर साठी करोडो रुपये खर्चूनही शहरांमध्ये स्वच्छतेचा अभाव पहावयास मिळत असल्याने नगरपालिका सपशेल फ्लॉप ठरली आहे.

माजलगाव शहरामध्ये विकासाच्या नावाखाली गत दोन वर्षांमध्ये जी रोड, नाली, पूल चे निकृष्ट दर्जाची विकास कामे करण्यात आली त्या कामांची आ. प्रकाश दादा सोळंके यांनी पाहणी करून त्या कामाचा दर्जा पहावा व अशा दर्जाहीन कामाची चौकशी लावावी. बोगस एम बी तयार करून बिल उचलून झाल्यामुळे जनतेचे व शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान होत असल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व क्रोशाचे वातावरण निर्माण झाली आहे. तर माजलगाव शहरात आ. प्रकाश सोळंके यांच्या आशीर्वादाने शहरातील मुख्य ठिकाणे असलेली अनेक एकर शासकीय जागा नगरपरिषदचे ओपन स्पेस व डब्बर खदान आरक्षित व सिंदफणा नदी सभोवताली असणाऱ्या रेड झोन व राखीव जागा जे माजलगाव शहरात मुख्य ठिकाणावर आहेत ज्यांची किंमत करोड अर्बो रुपये आहेत.

त्या जागांचे कार्यकर्त्यांनी भूमाफियांशी संमत करून काही नगरपरिषद चे अधिकारी कर्मचारी व इतर अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अफरातफर करून अवैध रित्या दस्तावेज तयार करत गिळांकत केली आहे. सदरील शहरातील गोरगरीब, दिनदलित, मोलमजुर, कष्टाची कामे करणारे डी आर डी अंतर्गत, भूमिहीन, दारिद्र्यरेषेखालचे अत्यंत बिकट परिस्थितीने गरीब व अल्पसंख्याक इतर नागरिकांना घरकुल देण्यासाठी राखीव व आरक्षित ठेवण्यात आलेले शहरातील मध्य भाग मुख्य ठिकाणची करोडो अर्बो रुपयाची जागाही आ. प्रकाश सोळंके यांचे जवळचे सहयोगी कार्यकर्ते यांनी मिळुन गिळांकत केली आहे. म्हणून येणाऱ्या काळात एनसीपी पक्षाचे आ. प्रकाश दादा सोळंके यांनी नागरिकांना या सर्व बाबीचा खुलासा द्यावा लागेल असे समाजवादी पार्टीचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे नागरिकांचे मनोगत मांडले आहे.



## ना.पंकजा मुंडे यांनी घेतली पशुधन गमावलेल्या शेतकरी कुटुंबाची दखल

बीड । प्रतिनिधी

नागापूर बु येथील शेतकरी अशोक शंकर गायकवाड हे आपल्या शेतात बैलगाडी घेऊन जात असताना वादळी वाऱ्यामुळे व पावसामुळे रस्त्यावर विजेची तार तुटून पडली होती. त्या तारेवरून बैलगाडी जात असता अशोक गायकवाड यांचा एक बैल विजेच्या तारेचा शॉक लागून जाग्यावर दगावला. या घटनेमुळे अशोक गायकवाड यांच्या कुटुंबावर आईन पावसाळ्याच्या तोंडावर फार मोठे संकट आले आहे. शेतकऱ्याच्या दावणीचा बैल अचानकपणे जाणे म्हणजे त्याच्या घरातील माणूस गेल्या एवढे दु:ख त्याच्या मनाला होत असते. विशेष म्हणजे बबन गायकवाड हे भूमी हीन असून त्यांना एक गुंठाही जमीन नव्हती ते लोकांच्या शेतात राजाणी बैल मशागत करून कुटुंबाचा उदर निर्वाह करत होते.

या घटनेची माहिती राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या पर्यंत गेली असता पंकजाताईंनी तात्काळ दखल घेत भाजपा युवा नेते गणेश लांडे यांच्या माध्यमातून संबंधित शेतकऱ्यास आर्थिक मदत केली आहे व महावितरण कंपनीकडून संबंधित शेतकऱ्यास मदत मिळण्यासाठी महावितरण बीड यांना आदेशित करून शेतकऱ्यास तात्काळ मदत देण्यासंदर्भात पंकजाताई मुंडे बोलल्या आहेत.

यावेळी राहुल टेकाळे, नागापूर सरपंच किशोर ढोकणे, जनार्दन लांडे, सिद्धेश्वर क्षीरसागर, गणेश विठ्ठल लांडे, बिबीशन क्षीरसागर, भालचंद्र लांडे, विठ्ठल ढोकणे, दिगंबर लांडे, अच्युत लांडे, सुनील क्षीरसागर, दिनकर लांडे, गोरक्षनाथ महाराज लांडे, नागनाथ सिंघण हे उपस्थित होते.

## इच्छूकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेध

आष्टी । प्रतिनिधी



अनेक दिवसापासून निवडणुकीच्या प्रतीक्षेत असलेल्या, तालुक्यातील कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेध लागल्याने, इच्छुक कार्यकर्त्यांनी पांढरा पेहराव करीत, जणू गुडघ्याला बाशिंग बांधल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्याचे मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेसह पंचायत समिती निवडणुकीची मोर्चा बांधणी सुरू झाली आहे. सप्टेंबर महिन्याच्या आधी निवडणूक होणार आहे. असे अंदाज गृहीत धरून इच्छुक उमेदवार आतापासूनच तयारीला लागले असून, लोकांना नमस्कार, रामराम करीत असून, गावातील युवकाचे वाढदिवस, विवाह सोहळा, अंत्यविधी, दशक्रिया विधी यासह अनेक छोट्या मोठ्या कार्यक्रमात अगत्याने हजर राहणे, भेटीगाठी घेणे याकाळात जास्त वाढल्या आहेत. अनेक कार्यकर्त्यांना निवडणुकीची चाहूल लागल्याने, सामाजिक प्रश्नाची मलाच कशी जान आहे. मीच कसा आवाज उठवू शकतो, मी जनतेचा कसा नेता होऊ शकतो, असा कळवळा दाखवत येत्या काळात समाज सेवी कार्यकर्त गावागावात पाहायला मिळणार आहेत.

निवडणुकीच्या रिंगणात उतरणारे आजी, माजी व नवीन उमेदवार गावातील लोकांशी संपर्क साधत आहेत, आपणही लोकांच्या प्रवाहात आहोत, याची जाणीव करून देण्याची कार्यकर्ते अक्षरश: धडपड करताना पाहायला मिळत आहेत. आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात सर्व आझी माजी लोकप्रतिनिधी यांचा मोठा प्रभाव असला तरी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट यांच्याकडून आष्टी तालुक्यात तगडे आवाहन असणार आहे.

## जयदत्त धस यांच्याकडून अतिवृष्टीच्या पुरामुळे नुकसान ग्रस्त गावाची पाहणी

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सिना नदीच्या काठावरील साकत, कुंटेफळ (वा.), लोणी, कोयाळ या गावांमध्ये अवकाळी पावसामुळे नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा ओघ वाढल्याने भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदीवरील बंधाऱ्यांमधून पाणी ओव्हरफ्लो झाल्याने नदीपात्र फुटून परिसरातील शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे कांदा, ऊस, मका व फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतांचे रस्ते पूर्णपणे वाहून गेले असून, काही भागांत विहिरी पाण्यात बुजल्या आहे. सोलर पंप व कांद्याच्या चाळी पाण्याखाली गेल्या आहेत. विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी जनावरांसाठी साठवलेला मुरघासही या पाण्यात मिसळला असून अंदाजे दीडशे ते दोनशे टन मुरघास वाया गेला आहे.

या घटनेची माहिती मिळताच युवा नेते जयदत्त धस यांनी तातडीने प्रशासनाला सोबत घेऊन पूरग्रस्त गावांची पाहणी केली. यावेळी तहसीलदार मॅडम यांच्याशी संपर्क साधून तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांना तातडीने घटनास्थळी पाठवले आणि पंचनाम्याचे काम त्वरित सुरू केले. साकत हे गाव अहिल्यानगर–सोलापूर हायवेपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असून या गावाचा मिरजगाव व अहिल्यानगर शहराशी दळणवळणाचा दैनंदिन संपर्क असतो. मात्र, पुरामुळे रस्ता पूर्णपणे वाहून गेल्याने गावाचा संपर्क तुटला आहे. याबाबत जयदत्त धस यांनी तातडीने संबंधित विभागाशी संपर्क साधून रस्ता पुनर्बांधणीसाठी आवश्यक कार्यवाहीची विनंती केली आहे.

या पाहणी दरम्यान श्री. उद्धव मोढवे पाटील, श्री. जयसिंग गव्हाणे, श्री. दादा शिंदे, श्री.बाळासाहेब कावरे, सरपंच श्री. सासवडे सर, सरपंच रक्ताटे, श्री. नीलकंठ रक्ताटे, श्री. मयुर मोढवे, श्री. राजु खुरांगे, श्री. दीपक शिंदे, गावातील शेतकरी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## व्याजाच्या पैशासाठी महिलेचा विनयभंग पीडितेला न्याय द्या, अन्यथा आंदोलन

बीड । प्रतिनिधी



व्याजाने घेतलेल्या पैशाचे व्याज दे अन्यथा मला खुश कर असे म्हणून एका २५ वर्षीय महिलेचा विनयभंग करत मारहाण करण्यात आली या पीडित महिलेला त्वरित न्याय द्यावा अन्यथा जय शिवसंग्राम च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात महिला जिल्हाध्यक्षा शेख शहानाज यांनी दिला.

बीड शहरातील गांधीनगर भागात राहत असलेल्या एका २५ वर्षीय महिलेच्या सासूने व्याजाने पैसे घेतले होते ते पैसे व व्याज लवकर द्या असे मागणे पीडित महिलेच्या पतीकडे केली परंतु संबंधित महिलेची सासू घरी नसल्याने लाकयत मिर्झा बेग व शफीक मिर्झा बेग पीडित महिलेच्या पतीला अरेरावी करू लागले तसेच पैसे देणे होत नसतील तर मला खुश कर असे म्हणून दि. २० मे रोजी सकाळी पैसे घेतलेल्या महिलेच्या २५ वर्षीय सुनेची छाती दाबून विनयभंग केला तसेच मारहाणही केली त्यामुळे पीडित महिला त्रस्त असून याप्रकरणी लाकयत मिर्झा बेग व शफीक मिर्झा बेग यांच्याविरुद्ध पेठ बीड पोलिसात तक्रार देण्यात आली आहे. या आरोपींवर पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई करून या महिलेला न्याय द्यावा अन्यथा जय शिवसंग्राम संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा महिला जिल्हाध्यक्ष शहानाज शेख यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## चौसाळा शहरातून पुन्हा मोटारसायकल चोरीला

### एपीआय गोसावी साहेब, चौसाळा परिसर चोरट्यांना मोकळा सोडला का?

चौसाळा । प्रतिनिधी

नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील चौसाळा परिसरात चोरटयानी धुमाकूळ घातला असुन एका मागे एक चोरीच्या घटना घडताना पाहावयास मिळत असुन नेकनुर पोलीस फक्त बघायची भुमिका घेत असल्यामुळे पोलीसाच्या कार्यप्रणाली वरती प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. चौसाळा शहरातील पांडुरंग कळासे या शेतकरयाच्या दहा शेळया चोरीला गेल्या आहेत तसेच नांदुर रस्त्या नजीक असलेल्या तुकाराम जोगदंड याची २५ हजार रूपये किमतीची मोटार चोरीला गेली त्याच बरोबर पालसिंगन येथिल पवनचक्की च्या आर्म क्रास कट करून तब्बल अडीच लाख रूपयाची ऐल्युमिनियम तारेची चोरी झाली तसेच चौसाळा बायपास वरती सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना लुटण्याचा प्रयन्त झाला.

या सर्व घटना ताज्या असतानाच काल रात्री चौसाळा शहरातील मुक्ताईनगर येथुन विठ्ठल नांदे यांची mh२३ BD ४९३७ युनिकोर्न कंपनीची मोटारसायकल चोरीला गेली आहे. या मोटारसायकल चोरी करताना चोरटे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले असुन चौसाळा पोलीस चोकिला विठ्ठल नांदे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात तिन चोरटया विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे परंतु या मोटारसायकल चोरीचा तपास लागणार का? चौसाळा परिसरातील चोरयाची मालिका थांबणार का? चौसाळा बायपास वरील लुटमारीच्या घटना थांबणार का? कर्तव्यदक्ष एस पी साहेब चौसाळा परिसर चोरटयाला आदन दिला का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.



## वडवणीमध्ये लॉजिंगच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; डीवायएसपी पूजा पवार यांचा छापा

**बीड शहरातील अवैद्य धंद्यांचा सफाया करा**

वडवणी । प्रतिनिधी



प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांनी अल्पावधीतच आपल्या धडाकेबाज कामगिरीतून पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांना लगाम लावल्यानंतर आता वडवणी मध्येही त्यांनी कारवाईची जोरदार मोहीम हाती घेतल्याने वडवणी मधील अवैध धंदेवाले सुद्धा त्यांच्या रडारवर आल्याने अवैद्य धंदेवाल्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक असल्याने त्या जिल्ह्यात कुठेही कारवाई करू शकतात. बीड शहरासह जिल्हाभरात पूजा पवार यांनी जर कारवाईची मोहीम हाती घेतली तर अवैध धंद्यांचा सफाया होऊ शकतो अशा प्रतिक्रिया आता नागरिकांतून बोलल्या जात आहेत.

पूजा पवार आणि त्यांच्या टीमने वडवणी मध्ये एका लॉजिग वर छापा मारून वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. वडवणी पोलिसांना जे जमले नाही ते पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांनी करून दाखवले अशी चर्चा सर्वत्र होत आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, वडवणी पोलीस ठाणे हद्दीतील साळींबा रोडबर असलेल्या संघर्ष लॉजिवर वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती डीवायएसपी पूजा पवार यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी आपल्या टीमला सोबत घेऊन सदरील ठिकाणी छाया मारला असता लॉजिंगवर दोन महिला व त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेणारे मालक आणि मॅनेजर नामे परमेश्वर सव्वाशे व रामेश्वर सव्वाशे यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

साधारण वर्षभरापासून संघर्ष लॉजिंगबर सुरू असलेला वेश्या व्यवसाय जोमात सुरू होता. कारण लॉजिंगवर वेगवेगळ्या ठिकाणाहून महिला व मुलींचा पुरवठा होत असून त्यांच्याकडून दोन ते अडीच हजार रुपये दराने वेश्या व्यवसाय करून घेतला जात होता. ही माहिती डीवायएसपी पूजा पवार यांना मिळताच त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या परवानगीने त्या ठिकाणी छापा मारून हे सर्व रॅकेट उध्वस्त केले आहे. या कारवाईने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पीएसआय गोलवाल, मुरली गंगावणे, गंगावणे यांनी केली आहे.

**जुगार अड्ड्यावर छापा; अवैध दारू पकडली**

डीवायएसपी पूजा पवार यांनी वडवणी मध्ये वेश्या व्यवसायावर छापा मारल्यानंतर पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील कुकडगाव या ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा मारला. त्यानंतर अनेक ठिकाणी छापा मारून अवैध दारू विक्रीवर कारवाई करण्यात आली. एका दिवशी वडवणीसह अनेक ठिकाणी आयोध्या धंद्यावर छापे टाकल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT